# राज्यशास्त्र विभाग अहवाल २०२३-२०२४

क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्याल,दिंडोरी.या आमच्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये विभागाच्या वतीने अभ्यासक्रमां व्यतिरिक्त विविध उपक्रम घेण्यात आले त्याचा सविस्तर अहवाल पुढील प्रमाणे.

**संविधान दिवस**

प्रतिवर्षाप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षामध्ये 26 नोव्हेबर हा संविधान दिवस याही वर्षी साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रल्हाद दुधाणे यांनी राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे सविस्तर स्पष्टीकरण केले. संविधानाने भारतीय नागरिकांना मूलभूत अधिकार दिलेले असून त्यामुळेच भारतीय नागरिकांचा आतापर्यंत विकास झालेला आहे.म्हणून भारतीय संविधान आपण सर्वांनी जपले पाहिजे व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले. यानंतर भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.एन.एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. नाना चव्हाण यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्र सांगळे यांनी आपल्या मनोगतात भारतीय संविधान हे जगातील सर्वात उत्तम संविधान असून या संविधानामुळे आजतागायत भारताचा विकास झालेला आहे.म्हणून या संविधानातील विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. असे मत त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या कार्यक्रमास डॉ.रुपाली शिंदे,प्रा.तेजस्विता मुंढे डॉ.आनंद सानप, डॉ.अरविंद केदारे,प्रा.वैशाली गांगुर्डे आणि इतर सिनिअर व ज्युनिअर विभागाचे सर्व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मानवी हक्क कार्यशाळा**

राज्यशास्त्र विभागा अंतर्गत दिनांक 7मार्च 2024 रोजी मानवी हक्क कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख मार्गदर्शक, एच.पी.टी.महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा.डॉ.प्रशांत देशपांडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र सांगळे यांच्या हस्ते क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नारायणराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रल्हाद दुधाणे यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक एच.पी.टी.महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा.डॉ.प्रशांत देशपांडे यांनी मानवी अधिकार माणसाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असून आपल्याकडून त्यांचे उल्लंघन होता कामा नये. हे मुलभूत अधिकार भारतीय राज्यघटनेने भारतीय नागरिकांना दिलेले आहेत. म्हणून प्रत्येकाने आपला

मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे. ज्यामुळे लोकशाही तत्वांचा आदर केला जाईल आणि प्रत्येकाला सुखी व आनंदी राहता येईल.असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले..महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा.डॉ.सुनील उगले म्हणाले की, व्यक्तीने अधिकार आणि कर्तव्य यांच्याकडे सारखेच पाहिले पाहिजे.कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र सांगळे यांनी व्यक्ती व समाज विकासात लोकशाहीची भूमिका व कार्याची माहिती दिली.कु.साक्षी वडजे हिने महिला सबलीकरण या विषयावर मनोगत व्यक्त केले.तसेच कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयावर बनवलेल्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला IQAC समन्वयक प्रा.वैशाली गांगुर्डे, प्रा.तेजस्विता मुंढे प्रा.चंद्रप्रकाश कांबळे, प्रा.डॉ.भैलुमे प्रा.डॉ.आनंद सानप,प्रा.डॉ.अरविंद केदारे, प्रा.अमोल गाढे, प्रा.चौधरी, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**4 एप्रिल 2024 व्याख्यांनाच्या माध्यमातून मतदान जनजागृती**

क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्याआमच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.राजेंद्र सांगळे यांच्या मार्गदर्शनानुसार मतदान जनजागृती अभियाना अंतर्गत राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रा.डॉ. गणेश गिरी व प्रा. डॉ. हनमंत वाघमारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा डॉ.आनंद सानप यांच्या हस्ते क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रल्हाद दुधाणे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.गणेश गिरी यांनी 'निवडणूक आयोग: अधिकार व कार्ये' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.त्यातून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व समजून सांगण्यात आले. दुसरे प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. हनमंत वाघमारे यांनी 'लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.मतदान आणि लोकशाही यांचा संबंध कसा आहे,स्वातंत्र्य आणि मतदानाचा संबंध कसा आहे.अशा विविध पैलूच्यामाध्यमातून कसा येतो याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.प्रा.डॉ.आनंद सानप यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात देशातील स्वायत्त संस्था महत्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे लोकशाही सुरक्षित राहण्यास मदत होत आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमात कु.साक्षी वडजे आणि कु.भारती उफाडे या विद्यार्थीनींनी "लोकशाही"या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र सांगळे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. नाना चव्हाण, प्रा. अमोल गाढे,प्रा. भारसकर, सय्यद मोबीन, योगेश बोडके, यांचेसह शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**8 एप्रिल 2024रोजी दिंडोरीत शहरात मतदान जनजागृती रॅली.**

क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी आणि पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी दिंडोरी, नगरपंचायत दिंडोरी व

दिंडोरी शहरातील विविध शाळा कॉलेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या व निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दिंडोरी शहरात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.आमच्या के. व्ही. एन. नाईक महाविद्यालयानेही उत्स्फूर्त सहभाग घेतला.रॅलीची सुरुवात व्ही.एन.नाईक. महाविद्यालया पासून जनता इंग्लिश मीडियम स्कूल ते बस स्टॅन्ड आणि नगरपंचायत दिंडोरी पर्यंत मतदार जनजागृती रॅली महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉक्टर राजेंद्र सांगळे उपप्राचार्य डॉ. सुनील उगले यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व प्रा. शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी,यांनी या रॅली मध्ये सहभाग घेतला.विविध मतदान जनजागृती विषयीचे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेवून मतदान जनजागृती विषयी च्या घोषणा दिल्या.रॅलीची सांगता दिंडोरी नगरपंचायत समोर करण्यात आली.या ठिकाणी मतदान जनजागृती वर पथनाट्य सादर करण्यात आले तसेच विविध व्यक्तींनी मतदान जनजागृती बाबत मनोगत व्यक्त केली. त्यात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सुनील उगले यांनी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे असे आव्हान सर्व नागरिकांना केले.तर प्रा. डॉ. प्रल्हाद दुधाने यांनी भारतीय लोकशाही ज्याप्रमाणे जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते त्याप्रमाणे 90 ते 95 टक्के लोकांनी मतदान केले पाहिजे. व जगाला भारतीय लोकशाही किती सक्षम आहे. हे दाखवून दिले पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. नाना सोमा चव्हाण डॉ.आनंद सानप प्रा. तुकाराम भवर प्रा.डॉ.रूपाली शिंदे प्रा.डॉ.संतोष भैलुमे आणि इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.